संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# चालक होऊ इच्छिणाऱ्या महिलांची भरारी

**देशभर** सध्या बेरोजगारीची चर्चा सुरु आहे. वस्तुस्थितीच तशी असल्याने चर्चा होणे स्वाभाविकही ठरते. बेरोजगारीचा विषय हा सामाजिक व्यवस्थेशी निगडीत असल्याने त्याची वारंवार दखल घेणे क्रमप्राप्त ठरते. यासंदर्भात सरकारी आकडेवारीने बराच खुलासाही केलेला आहे. खुलासा याचा अर्थ देशात बेरोजगारी नाही. असे म्हणण्यापासून नोकरी मागणाऱ्यांची संख्या कशी वाढत आहे. हे सांगण्यापर्यंत या सरकारी आकडेवारीचा उपयोग होतो. देशाची काय परिस्थिती आहे. हे जरी काहीवेळ बाजूला ठेवले तरी महाराष्ट्रात बेरोजगारीचा प्रश्न बराच गंभीर आहे हे नाकारून चालणार नाही. गेल्याच महिन्यात सरकारने ९ हजार जागांसाठी अर्ज मागवले होते आणि त्याकरीता तब्बल आठ लाख अर्ज आल्याची माहिती सरकारकडूनच दिली गेली होती. नोकरी मागणाऱ्यांचे प्रमाण किती मोठे आहे हे त्यातून स्पष्ट झाले होते. आता पुन्हा त्याच परिस्थितीला दुजोरा देणारी दुसरी आकडेवारी समोर आली आहे. राज्याच्या मार्ग परिवहन मंडळात म्हणजेच एसटीमध्ये चालक वाहक म्हणजेच ड्रायव्हर आणि कंडक्टरच्या २४०६ जागा भरायच्या आहेत त्यासाठी ९०० महिलांनी अर्ज केले आहेत. गेल्या वर्षी अशाच प्रकारची जाहीरात प्रकाशित झाली होती. त्यावेळी चारशे महिलांचे अर्ज आले होते. आता ही संख्या जवळपास दुप्पट झाली आहे. राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या बसेस चालवण्याकरीता आतापर्यंत एकाही महिला चालकाची नियुक्ती झालेली नाही. परंतु आता महिलांनीदेखील एसटी बस चालवण्याची इच्छा व्यक्त करावी. ही गोष्ट सामाजिकदृष्ट्या फार महत्वाची ठरते. महिला या पुरुषांच्या बरोबरीने काम करू शकतात. हे वाक्य केवळ आता भाषणापुरते किंवा लिखाणापुरते शिल्लक राहिलेले नाही तर प्रत्येक क्षेत्रामध्ये महिला आपली क्षमता सिध्द करण्यासाठी पुढाकार घेतात. याचेच ते निदर्शक ठरते. आता बेरोजगारी आहे आणि घरसंसार, प्रपंच चालवण्याकरीता काही ना काही नोकरी केली पाहिजे. ज्यावेळी इतक्या मोठ्या संख्येने महिला चालक किंवा ड्रायव्हर पदासाठीसुध्दा अर्ज करतात त्यावेळी त्यांना रोजगाराची किंवा नोकरीची गरज आहे. हे अधोरेखित होते. परंतु महिला असूनही त्या जेव्हा एसटी बस चालवायलाही तयार होतात त्यावेळी फक्त नोकरी हाच मुद्दा नसतो तर त्यांना वेगळे काहीतरी करून दाखवायचे असते. स्वतःमधल्या क्षमतांना जोखायचेही असते. या दृष्टीकोनातून त्यांनी केलेले हे अर्ज महत्वपूर्ण ठरतात.

### सामाजिक परिणाम

हा भाग वेगळा की आज महिला विमाने चालवतात. पायलट होतात. मग त्यांनी ड्रायव्हर म्हणून नोकरीसाठी अर्ज केले तर त्यात विशेष काय. असे अनेकांना वाटू शकेल. परंतु समाजात विविध प्रकारचे स्तर असतात आणि जशी संधी मिळेल त्या पध्दतीने महिलांना नोकऱ्याही उपलब्ध होतात. वैमानिक किंवा पायलट होण्यासाठी येणारा खर्च त्यासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता, स्वतःची आर्थिक स्थिती अशा अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. एसटीचा चालक होण्याकरीता दहावी पास होणे आणि उंची १५२ सेंटीमीटर असणे याच काय त्या प्रमुख अटी ठेवल्या जातात. निवड करण्याकरीता लेखी परीक्षा घेतली जाते. या सर्व गोष्टींची पूर्तता करणाऱ्यांची निवड होऊ शकते. गेल्या वर्षीच्या अनुभवाप्रमाणे लेखी परीक्षेत बरेच अर्जदार मागे पडतात. आणि त्यांची निवड होऊ शकत नाही. परंतु या महिला उमेदवारांची वाहन चालवण्याची क्षमता जर व्यवस्थित असेल तर त्यांना तशी संधी दिली गेली पाहिजे. काही अटी शिथील करून एसटी बसचालक म्हणून त्यांना नियुक्त करता येऊ शकते. त्यांनी केलेले अर्ज हे केवळ नोकरी मागणारे आहेत. असा मर्यादित अर्थ न घेता महिला म्हणून त्यांनी दाखवलेले धैर्य आणि आतापर्यंत न घडलेली गोष्ट असा विचार करून त्यांना ही संधी देणे योग्य ठरू शकते. कदाचित देशातले महाराष्ट्र हे एकमेव राज्य ठरू शकेल की जिथे पहिल्यांदाच राज्य सरकारच्या परिवहन खात्यामध्ये महिला चालक नियुक्त होऊ शकतील. जिथे जिथे गुणवत्ता आणि क्षमता यांचा उपयोग होऊ शकतो तिथे तिथे पुरुषांप्रमाणेच महिलांना रोजगाराच्या संधी मिळू शकतात. या गोष्टींचे अनेक दूरगामी परिणामही आहेत जे एकूणच सामाजिक परिस्थितीला अधिक भक्कम करू शकतात.

### डान्सबारपेक्षा चांगला रोजगार

नोकरीसाठी महिलांनी केलेले अर्ज असा साचेबंद अर्थ न काढता महिलांनी इतक्या संख्येने अर्ज का केले त्यांना ते का करावेसे वाटले. यामधला मतितार्थ लक्षात घेतला पाहिजे. जी गोष्ट आतापर्यंत घडलेली नाही किंवा महिलांच्या कर्तृत्वाचा जिथे विशेष गौरव होणार आहे. ज्यामधून महिलांचा सन्मान वाढणार आहे. या अर्थाने त्यांनी केलेल्या या अर्जांकडे पाहिले पाहिजे. आज नाईलाजाने महिलांना नको त्या क्षेत्रामध्ये नोकरी करण्याची वेळ येते. जिथे त्यांचा सन्मान होण्याऐवजी स्त्रीत्वाचा अपमान होण्याचीच शक्यता असते त्याऐवजी कार्यक्षमता आणि गुणवत्तेच्या जोरावर त्या आपला सन्मान अधोरेखित जेव्हा करतात. तेव्हा त्याचे वेगळे सामाजिक परिणामही निर्माण होतात. डान्सबारमध्ये काम करणाऱ्या महिलांना मिळणारी वागणूक ही सन्मानाची नसते. डान्सबार बंद झाल्यानंतर त्या महिलांच्या बेरोजगारीच्या नावाने अनेक स्वार्थी लोक गळा काढतात. परंतु याच महिलांना जर योग्य मार्गदर्शन दिले गेले आणि त्यांना त्यांच्या क्षमतांची जाणीव करून दिली तर कितीतरी मोठा आशय सिध्द होतो. म्हणजे कुटुंब आणि समाज या दोन्ही आघाड्यांवर त्यांचे कर्तृत्व लखलखीत होऊ शकते. बेरोजगारी आहेच पण त्यावरची ही कर्तृत्वाची भरारीसुध्दा सामाजिकदृष्ट्या नोंद घेण्यासारखी ठरते. म्हणूनच महाराष्ट्रात पहिल्यांदाच एसटीची बस चालवण्याकरीता महिला चालकांनी घेतलेला हा पुढाकार लक्षणीय ठरतो.